ISSN 2320 - 4494
RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Resarch Journal

**Volume : II Issue : II July to Sept.- 2018**



ARTS | COMMERCE | SCIENCE | AGRICULTURE | EDUCATION | MANAGEMENT | MEDICAL | ENGINEERING & IT | LAW | SOCIAL SCIENCES | PHYSICAL EDUCATION | JOURNALISM | PHARMACY

Editor

**Sarkate Sadashiv Haribhau**

Email : powerofknowledge3@gmail.com, shsarkate@gmail.com

RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

**An International Multilingual Quarterly Refereed Research Journal**

**Editor**
**Dr. Sadashiv H. Sarkate**

**• Mailing Address •**
**Dr. Sadashiv H. Sarkate**
**Editor : POWER OF KNOWLEDGE**
**Associate Professor &Head of Dept. Marathi**
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com

**Price : Rs. 300/-**
**Annual Subscription: Rs. 2000/-**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाही

**प्रा.डॉ. रंदिल गजेंद्र साहेबरा**
शि.गु.रा.गे. शिंदे महाविद्यालय, परं
जि. उस्मानाबाद (मराठी विभाग

**प्रस्तावना :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीचा विचार सभोतालच्या, आर्थिक वास्तवाच्या संदर्भात केला असल्यामु त्यात आदर्शापेक्षा व्यवहारिक प्रश्नांचे विवचन करण्यात आलेले आहे. सामान्यातील सामान्य माणसाच्या प्रतिष्ठेची प्रतिष्ठाप करणारा विचार म्हणून आंबेडकरांना लोकशाही बद्दल आस्था वाट होती. प्रत्येक देशात प्रस्थापितांची एकाधिकारशाही न होऊन वर्षानुर्षे सत्ता वंचित राहिलेल्या पददलित वर्गांना सत्ता प्राप्त होणे ही आंबेडकरांच्या मते लोकशाहीची कसोटी असत सार्वत्रिक प्रौढ सत्ताधिकारांच्या माध्यमातून ही यशस्वीतता मोजली जाते.

आंबेडकरांच्या मते, राजकीय लोकशाही ही चार गृहीतांवर आधारलेली असते. १) व्यक्ती हेच एकमेव साध आहे. २) व्यक्तीला काही आदेश हक्क असतात व घटनेने त्या हक्कांची हमी त्याला दिलीच पाहिजे. ३) कोणत्या विशेषाधिकाराच्या प्राप्तीखातर व्यक्तीला आपल्या हक्काचा त्याग करावा लागू नये. ४) इतरांवर शासन करण्याची सत्त राज्य संस्थेकडून कोणत्याही खाजगी व्यक्तींना दिली जाता कामा नये. कोणत्याही स्वरुपाच्या हुकूमशाहीला आंबेडकरांच विरोध होता. कारण हुकूमशाहीत व्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी होते. हक्कांचा लाभ जास्तीत जास्त लोकांना होणे ह आंबेडकरांच्या मते लोकशाहीचा सर्वश्रेष्ठ निकष आहे.

घटना समितीत व त्यापुर्वी १९४२ मध्ये आंबेडकरांनी संसदीय लोकशाहींची भलावण केली असली तरी घ्स्टेट ॲन्ड मायनॉरिटीजङ या ग्रंथात त्यांनी संसदीय लोकशाहीपेक्षा अन्य प्रकारच्या लोकशाहीचा पुरस्कार केला. इंग्लंडमध अल्पमत, बहुमत राजकीय आधारावर असते. तसे होण्याची भारतात शक्यता नाही. कारण इथले बहुमत जातींवर आधारी असेल. याविषयी आंबेडकरांना खाजी होती. त्यामुळे अल्पसंख्य गटांना कायम जाच होण्याचीच शक्यता अधिक दिस होती. अमेरिकेसारखी अध्यक्षीय शासन पध्दती स्वीकरल्यानंतर कार्यकारी मंडळाला आपल्या कार्यकाळाची हमी मि शकेल आणि विधिमंडळा बाहेरील योग्य व्यक्तीला कार्यपालिकेत समाविष्ट सुध्दा करता येईल. या दृष्टीने अध्यक्षीय शास पध्दती आंबेडकरांना योग्य वाटत होती. पुढे मात्र आंबेडकरांनी आपल्या या भूमिकेला मुरड घालून संसदीय शास पध्दतीची उपयुक्तता अधोरेखीत केली. संसदीय लोकशाही व्यक्तींच्या अंगी आत्मनिर्भरता, उपक्रमशीलता व जबाबदारीच जाणीव निर्माण करु शकते. रक्तपात न घडविता सामाजिक व आर्थिक क्षेत्रात मुलभुत स्वरुपाचे बदल घडवून आणण्याच मूलमंत्र फक्त संसदीय पध्दतीलाच अवगत असतो. दुसरे म्हणजे वादग्रस्त प्रश्नांवरती मोकळया चर्चेअंती व सर्वसंमती निर्णय घेण्याची तरतूद फक्त संसदीय पध्दतीतच असते. प्रबल विरोधी पक्ष स्वतंत्र वृतपत्रे आणि मुक्त निवडणुका ह संसदीय लोकशाहीचा वैशिष्टये आंबेडकरांना फार महत्त्वाची वाटतात.

भारताच्या संदर्भात संसदीय लोकशाही शिवाय दुसरा पर्यायच नाही असे आंबेडकरांचे मत होते. संसदीय पध्दती राजकीय क्षेत्रापासून सुरु झालेली लोकशाहीकरणाची प्रक्रिया हळूहळू सामाजिक व आर्थिक क्षेत्राकडे संक्रमित होते. याक आंबेडकर यांनी लक्ष वेधले. स्वातंत्र्यावर लक्ष केंद्रीत करुन आर्थिक विषमतेकडे दुर्लक्ष झाल्यास संसदीय लोकशाही आर्थिक अन्यायाचे साधन ठरु शकते. आर्थिक व सामाजिक लोकशाहीची उपेक्षा करुन राजकीय लोकशाहीचा डोलारा फ काळ टिकू शकत नाही, असा इशारा आंबेडकर यांनी दिला. आंबेडकरांनी सामाजिक लोकशाहीचा पुरस्कार केला आह त्यांच्या मते लोकशाही ही सामाजिक संघटना आहे. समाजात योग्य ती सुधारणा व प्रबोधन न झाल्यास त्यात राजकी

लोकशाहीची प्रगती होण्याची सुतराम शक्यता नसते. त्यामुळेच त्यांनी सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला. लाोकशाही आणि लोकशाही समाजावाचून अशक्य असते. त्यामुळे योग्य मानसिक दृष्टीकोन निर्माण होणे व योग्य अशी समाजरचना असणे आंबेडकरांना आवश्यक वाटते. भारतातील दारिद्रय, जातीय वेगळेपण व निरक्षरता हे लोकशाहीचा मार्गातील अडथळे आहेत, असे आंबेडकरांना वाटत होते. त्यामुळे ब्रिटिश राजकर्त्यांना असे आवाहन केले की, इथल्या समाजव्यवस्थेचे जात आणि वर्ग आहेत. त्यांचे प्रतिबिंब नव्या राजकीय व्यवस्थेत पडणार नाही याची दक्षता घ्यावी. पददलितांना शिक्षण, नोकरी व प्रगती यांच्या वाटा जर खुल्या होणार नसतील तर स्वराज्य हे गुलामगिरीचेच नवे नाव ठरेल, असे आंबेडकर म्हणतात.

केवळ एक व्यक्ती एक मतङ हे तत्त्व सामाजिक लोकशाहीसाठी पुरेसे नसते तर ते आमलात आणले जाणे आवश्यक असते. आंबेडकरांच्या मते उपाशी पोटी राहणाऱ्या व्यक्तीला मतांचे मोल फुटक्या कवडीपेक्षा जास्त वाटायची शक्यता नाही. म्हणून आधी परिस्थिती बदलली पाहिजे. सर्वांच्या किमान प्राथमिक गरजा भागवल्याच पाहिजे. समाजात सर्वांचा समान दर्जा प्रस्थापित झाला पाहिजे. तरच लोकशाही यशस्वी होईल. भारताची ही सामाजिक व आर्थिक परिस्थिती दिसत असल्यामुळे केवळ राजकीय लोकशाही नव्हे तर सामाजिक व आर्थिक लोकशाहीचे आव्हान पेलल्याचे आवाहन त्यांनी केले. एक व्यक्ती एक मत हे राजकीय लोकशाहीचे तत्त्व मान्य करताना सामाजिक व आर्थिक लोकशाहीची जबाबदारी त्यांनी सरकारवर टाकले.

भारतीय जातीव्यवस्था इथल्या लोकशाही प्रक्रियेला खीळ घालते अशी तक्रार आंबेडकर करतात. इथले मतदार जाती निहाय होते, बहुसंस्थेच्या उमेदवाराला मत देणे अल्पसंख्याक समाजाला भाग पडते. अल्पसंख्याकांची मते तोकडी असतात. बहुसंख्याक जाती गटातील मतदार अल्पसंख्याक जातीच्या उमेदवाराला मते देत नाहीत. अशा परिस्थितीत बदलत्या राजकीय बहुमतापेक्षा सातत्यपूर्ण जातीय बहुमताचे वर्चस्व प्रस्थापित होण्याचा धोका अटळ असतो.
डॉ. आंबेडकरांनी लोकशाहीच्या यशस्वीतेचे घटक पुढीलप्रमाणे सांगितले आहेत. १) लोकशाहीच्या यशासाठी समाजात समूहभावनेचा विकास झाला पाहिजे. २) लोकशाहीत व्यक्तीपूजेला स्थान असू नये. ३) राजकीय लोकशाही यशस्वी होण्यासाठी सामाजिक लोकशाहीची प्रस्थापना होणे आवश्यक असते. ४) व्यक्तिस्वातंत्र्याची प्रस्थापना व जपणूक लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक असते. ५) प्रबळ विरोधी पक्ष असणे लोकशाहीसाठी भूषणावह असते. ६) लोकांच्या मनात सहानुभूती, प्रेम, सहिष्णुता असल्याशिवाय लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही. ७) लोकशाहीत व्यक्तींच्या निष्ठा व्यापक असाव्या लागतात.

**समारोप :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीचा सामाजिक व आर्थिक दृष्टिकोनातून विचार केला आहे. सामाजिक लोकशाहीवरच राजकीय लोकशाहीची इमारत उभी असते असे त्यांचे म्हणणे होते. सामाजिक विषमता असे पर्यंत मत स्वातंत्र्य व इतर राजकीय स्वातंत्र्य अर्थहीन ठरते असे त्यांनी ठासून सांगितले होते. त्यामुळे त्यांनी सामाजिक लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला होता.

**संदर्भग्रंथ :-**


१) [illegible] आर. एम. :- शार्प पब्लिकेशन, पुणे-३०, पृष्ठ-३.२, पृष्ठ-३.३
२) पानतावणे, डॉ. गंगाधर :- पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पृष्ठ-३९८
३) लिंबाळे, शरणकुमार :- दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र, पृष्ठ-५८
४) कीर, धनंजय :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र, पृष्ठ-४७५
५) आंबेडकर बाबासाहेब :- दै. सकाळ, पुणे-३०, नोव्हेंबर १९४४.